# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 02 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०२ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- संसदेच्या कामकाजाचा पेच सोडवण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक, दोन्ही सदनात संविधानावर विशेष चर्चेचं आयोजन
- खासगी उद्योग समुहाच्या कथित लाचखोरी प्रकरणावरुन संसदेचं कामकाज सलग पाचव्या दिवशी ठप्प
- भाजपच्या विधीमंडळ पक्षनेत्याच्या निवडीसाठी केंद्रीय निरीक्षकांची नेमणूक
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या राष्ट्रीय दिव्यांग पुरस्कार प्रदान करण्यात येणार, तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर

आणि

- जागतिक एड्स दिनानिमित्त आज विविध ठिकाणी जनजागृतीपर रॅलीचं आयोजन

****

संसदेच्या कामकाजाचा पेच सोडवण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीत सर्व राजकीय पक्षांनी, सभागृहाचं कामकाज सुरळीत चालवण्याचं मान्य केलं. काँग्रेसचे गौरव गोगोई, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्यासह इतर सदस्य यावेळी उपस्थित होते

१३ आणि १४ डिसेंबर रोजी लोकसभेत संविधानावर विशेष चर्चा होणार आहे. त्यानंतर राज्यसभेतही चर्चा होईल. विरोधकांनी सहमती दर्शवल्यानंतर उद्यापासून संसदेचं कामकाज सुरळीत सुरू होईल, उद्या पहिलं विधेयक लोकसभेत आणि नंतर

राज्यसभेत मांडलं जाईल तसंच विरोधकांनी दिलेल्या आश्वासनामुळे कामकाज सुरळीत पार पडेल, असं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. ते म्हणाले –

***सोलह और सतरह पर राज्यसभा मे संविधान पर चर्चा होगा। इसके अलावा स्पीकर साहब ने भी कहां है, कोई भी मुद्दा अगर उठाना चाहेगा तो उसका नियम होता है। अनुमती प्राप्त करने पर आप नोटीस दे सकते है।***

****

दरम्यान, एका खासगी कंपनीचं कथित लाचखोरी प्रकरण आणि संभलमधल्या हिंसाचारासह विविध मुद्यांवरून संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज सलग पाचव्या दिवशी बाधित झालं.

लोकसभेत सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी विविध मुद्यांवर चर्चेची मागणी केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू केल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. गोंधळ सुरूच राहिल्याने अध्यक्षांनी कामकाज आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही याच मुद्यांवरून विरोधकांनी दिलेला स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे राज्यसभेतही गदारोळ सुरू झाला. धनखड यांनी चर्चा करण्याची विनंती करूनही गोंधळ सुरूच राहिल्यानं, त्यांनी सभागृहाचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

****

कौशल्याधारित उद्योगांसाठी देशभरात २०२ उत्कृष्टता केंद्र सुरु करण्यात आल्याची माहिती, केंद्रीय कौशल्यविकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांनी दिली. ते आज लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. हस्तकलांवर आधारित उद्योगांना अधिक विस्तृत बाजारपेठ मिळवून देणं, आणि त्या कौशल्यांचं प्रशिक्षण देणाऱ्या संस्था तयार करणं, या उद्देशाने ही केंद्र स्थापन केल्याचं त्यांनी सांगितलं. पर्यावरण पूरक उद्योगांमधून रोजगारनिर्मितीसाठी एक क्षेत्र समर्पित असून, प्रधानमंत्री सूर्य घर योजनेमार्फत एक लाख रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

राज्यात सरकार स्थापनेबाबत अद्याप कोणतीही घोषणा झाली नाही. भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. विधीमंडळ पक्षनेत्याच्या नेमणुकीसाठी भाजपाच्या संसदीय मंडळाने दोन निरीक्षकांची नेमणूक केली आहे. यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा समावेश आहे. राज्यात नवीन सरकारचा शपथविधी येत्या गुरुवारी पाच तारखेला होणार आहे.

****

दरम्यान, शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार असल्याचं वृत्त निराधार असल्याचं स्वतः श्रीकांत शिंदे यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केलं आहे. यापूर्वी आपल्याला केंद्रात मंत्रिपदाचा प्रस्ताव मिळाला होता, मात्र आपण तो नाकारला. पक्ष संघटना आणि लोकसभा मतदार संघावर लक्ष केंद्रीत करणार असून, राज्यातल्या कोणत्याही मंत्रिपदात आपल्याला रस नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीत मतमोजणीमध्ये पोस्टल मतदान आणि इव्हिएममधल्या मतदानामध्ये तफावत दिसत असून, पोस्टल मतदानाचा ट्रेंड जो आहे तो इव्हिएममधल्या मतदानात दिसत नाही, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव आणि आमदार वरुण सरदेसाई यांनी दिली. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी काही मतदारसंघातल्या उमेदवारांना मिळालेल्या आकडेवारीची माहिती दिली. या ट्रेंडबद्दलचा खुलासा निवडणूक आयोगाने करावा, अशी मागणी सरदेसाई यांनी केली.

****

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोक्कलिंगम यांनी दिला आहे. ईव्हीएम गैरव्यवहारांबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत आरोप केले जात आहेत, त्याचवेळी चोक्कलिंगम यांनी हे विधान केलं. या प्रकरणी अधिकारी सखोल तपास करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. परदेशात वास्तव्यास असलेल्या आणि ईव्हीएममध्ये घोटाळा

झाल्याचा आरोप करणारी पत्रं पाठवणाऱ्या सय्यद शुजा यांच्या विरोधात निवडणूक आयोगानं गुन्हा दाखल केला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

****

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हे देखील या कार्यक्रमाला संबोधित करतील. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

****

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. भोपाळमधे झालेल्या युनियन कार्बाईड विषारी वायू दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी दोन डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून पाळला जातो. ही दुर्घटना तीन डिसेंबर १९८४ रोजी घडली होती.

****

जागतिक एड्स दिन काल पाळण्यात आला, त्यानिमित्त विविध ठिकाणी काल आणि आजही अनेक जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर शहरात आज जाणीवजागृती रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी क्रांती चौक इथं या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसंच महाविद्यालयातले विद्यार्थी, नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. प्रसिद्ध रंगकर्मी

मदन मिमरोट यांच्या कलापथकाने जागृती पर सादर केलेल्या कार्यक्रमाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

हिंगोलीत आज जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय परिचारिका प्रशिक्षण केंद्रानं जनजागृती रॅली काढली होती. हिंगोलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. उपस्थितांना या कार्यक्रमात एड्स नियंत्रणाबाबत शपथ देण्यात आली.

बीड इथंही जागतिक एड्स दिनानिमित्त आज छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनपर्यंत जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव जी.जी.सोनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी हिरवा झेंडा दाखवून या फेरीला सुरुवात केली. सर्व उपस्थितांना यावेळी एड्स मुक्त जीवन जगण्याची शपथ देण्यात आली.

****

परभणी जिल्ह्यात हिवाळी हंगामातल्या रब्बीच्या पिकांसाठी जायकवाडी, निम्न दुधना आणि येलदरी धरणातून कालव्यातून पाणी सोडण्यात आलं आहे. ही शेतकऱ्यांसाठी आनंदाची बाब असली तरी याचदरम्यान महावितरणकडून विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्यानं कमी दाबाची वीज मिळत असल्याने मोटार पंप जळण्याचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. रब्बीच्या पेरणीचा कालावधी संपत असल्याने वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बांगलादेशातल्या हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व पक्षाचे नेते तथा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केलं. मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजीक सातारा परिसरातल्या खंडोबा अर्थात मार्तंड भैरव यात्रेला आजपासून प्रारंभ झाला. ८०० वर्षांपेक्षा अधिक काळाची या यात्रेची परंपरा असून, या यात्रेत राज्यभरातून लाखो भाविक सातारा परिसरात येत असतात. येत्या

सात ते नऊ डिसेंबर दरम्यान दर्शनाला होणारी गर्दी लक्षात घेऊन मंदिर देवस्थानकडून चोख व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती, देवस्थानचे सचिव साहेबराव पळसकर यांनी दिली.

****

हवामान

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळं परभणी जिल्ह्यात कालपासून ढगाळ वातावरण निर्माण झालं आहे, त्यामुळं थंडी कमी झाली आहे. आज परभणी शहरासह काही भागात जोरदार पाऊस झाला. दरम्यान, ढगाळ वातावरण आणि पावसामुळं हरभरा, तूर पिकांवर अळीचा प्रादुर्भाव होत आहे तर शेवटच्या टप्प्यातील कापूस भिजल्यानं नुकसान झालं आहे.

****